द्विवेदी कुटुंबियांच्या मदतीसाठी धावले आ. सुधीर मुनगंटीवार; तीन वर्षीय चिमुकलीला मिळाले नवे आयुष्य.
सतना (मध्य प्रदेश) येथील बालिकेवर नागपूर एम्समध्ये यशस्वी शस्त्रक्रिया.
आशाताई महाकाले यांनी साधला संपर्क; आ. मुनगंटीवारांनी तातडीने केली मदत, कुटुंबीयांकडून आभार.
चंद्रपूर : लोकप्रतिनिधीपद म्हणजे केवळ विकासकामे आणि राजकारण नव्हे, तर समाजातील दुःखी, वंचित आणि गरजूंच्या वेदना समजून घेऊन त्यांच्या मदतीला धावून जाणे, हे आपल्या कृतीतून सिद्ध करणारे राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा माणुसकीचा जिवंत प्रत्यय दिला आहे. मध्य प्रदेशातील एका अत्यंत गरीब कुटुंबाची तीन वर्षीय चिमुकली गंभीर शारीरिक व्याधीमुळे वेदनादायी आयुष्य जगत होती. आर्थिक अडचणींमुळे तिच्या उपचाराची आशाच मावळत असताना आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वेळेवर मिळालेल्या सहकार्यामुळे नागपूर येथील एम्स रुग्णालयात तिच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली. या शस्त्रक्रियेमुळे केवळ एका बालिकेला नवजीवन मिळाले नाही, तर तिच्या संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यात आशा, दिलासा आणि आनंदाचा नवा किरण उजळून निघाला आहे.*
मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यातील मलगाव येथील रहिवासी श्री. राजमन द्विवेदी हे चंद्रपूर येथील श्री महाकाली देवस्थानाशी संबंधित महाकाले कुटुंबाकडे अनेक वर्षांपासून माता महाकालीच्या नैवेद्य व स्वयंपाकाची सेवा बजावत आहेत. त्यांच्या तीन वर्षीय नातीला जन्मापासूनच कमरेच्या हाडाची गंभीर समस्या होती. त्यामुळे तिला चालताना त्रास होत होता. डॉक्टरांनी योग्य वयात शस्त्रक्रिया न झाल्यास भविष्यात मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात, असा इशारा दिला होता. मात्र कुटुंबाची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती असल्याने उपचाराचा खर्च करणे त्यांच्यासाठी अशक्य होते.
आपली व्यथा श्री. राजमन द्विवेदी यांनी सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या सौ. आशाताई प्रकाश महाकाले यांच्यासमोर मांडली. यानंतर सौ. आशाताई महाकाले यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. गरजूंच्या मदतीसाठी नेहमी तत्पर असलेले आ. मुनगंटीवार यांनी क्षणाचाही विलंब न करता नागपूर येथील एम्स रुग्णालयातील संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. तसेच आपल्या स्वीय सहायक सागर खडसे यांना संपूर्ण प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.या प्रयत्नांना यश येत अखेर दिनांक ७ जून २०२६ रोजी नागपूर येथील एम्स रुग्णालयात बालिकेवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.
शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर श्री. राजमन द्विवेदी आणि त्यांचे पुत्र श्री. विपिन द्विवेदी यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार, सौ. आशाताई महाकाले यांचे मनःपूर्वक आभार मानले. “आर्थिक परिस्थितीमुळे मुलीच्या उपचाराची आशा आम्ही जवळपास सोडून दिली होती. मात्र योग्य वेळी मिळालेल्या या मदतीमुळे आमच्या चिमुकलीला नवजीवन मिळाले,” अशा भावनिक शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.
गरजवंतांच्या मदतीसाठी पुढाकार घेणे हीच खरी लोकसेवा असल्याचे आपल्या कृतीतून दाखवून देत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा एका कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण केला आहे.